जिल्हाधिकारी यांना नगर पंचायत अध्यक्ष पदांच्या थेट निवडणूक नियमांतर्गत राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने प्राधिकृत व अधिकार प्रदान करणेबाबत........

**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र**
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७/११/२०१७.

**आ दे श**

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३९/का-६.- ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए नुसार राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

२. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७, **दिनांक ०२/११/२०१७** अन्वये नगरपंचायतींच्या अध्यक्ष पदाकरिता थेट निवडणूक घेण्याची तरतूद केली आहे.

३. आणि ज्याअर्थी, या सुधारणानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) चे कलम ३४१ब-१अ च्या पोट कलम ३ नुसार अध्यक्षाची निवडणूक नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबर एकाचवेळी घेण्यात येईल आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेण्यासंदर्भातील कार्यपध्दती अशा निवडणुकीस, योग्य त्या फेरफारांसह, लागू होईल अशी तरतूद आहे;

४. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपंचायती (अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक) नियम, २०१७ च्या नियम ७३ नुसार या नियमांमध्ये, काहीही अंतर्भूत असले तरी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांशी सुसंगत असतील असे नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदांच्या थेट निवडणूक घेण्याबाबतीत स्वतंत्रपणे निर्देश देऊ शकतील.

५. या अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आ दे श**

(i). सोबतच्या परिशिष्ट-१ च्या रकाना २ मध्ये नमूद अधिनियमाचे कलम, पोट कलम, आणि नियमांचे पोट नियम इत्यादीअंतर्गत राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

(ii) जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाचे आदेश, निदेश व सूचना आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-४०) चे कलम १०-अ च्या पोटकलम ४ मधील तरतुदींच्या अधिन राहून कार्यवाही करावी.

(iii) सोबतच्या परिशिष्ट-२ च्या रकाना २ मध्ये नमूद नियम आणि पोटनियम इत्यादी अंतर्गत कार्यवाही करण्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्हयातील नगरपंचायतींमधील अध्यक्ष पदाच्या थेट निवडणुकीकरिता राज्य निवडणूक आयुक्त यांच्यावतीने प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( री. वि. फणसेकर )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,

१. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई- ४०० ०२५
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
५. मुख्याधिकारी, नगरपंचायती (सर्व)
६. मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक
७. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती (कार्या-६)

# परिशिष्ट-१

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३९/का-६, दिनांक-१७/११/२०१७ सोबतचे परिशिष्ट)

| अ.क्र. | महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ कलम क्रमांक महाराष्ट्र नगर पंचायती (अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक) नियम, २०१७ मधील नियम क्रमांक | प्रदान केलेले अधिकार |
|---|---|---|
| १. | नियम ६ | संपूर्ण अधिकार |
| २. | अधिनियम कलम क्र. १९(१), (२) व (४) | संपूर्ण अधिकार |

## परिशिष्ट-२

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३९/का-६, दिनांक १७/११/२०१७ सोबतचे परिशिष्ट)

| अ.क्र. | महाराष्ट्र नगरपंचायती (अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक) नियम, २०१७ मधील नियम क्रमांक | प्राधिकृत केलेले अधिकार |
|---|---|---|
| १. | नियम ७(१), (२) (क), (ख) व (ग) (३) | राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे निवडणुकीच्या सर्व टप्प्यांबाबतचे आदेश विहित नमुन्यामध्ये प्रसिध्द करणे. |
| २. | नियम ८(१) (२) व (३) | राष्ट्रीय किंवा राज्य दुखवटयाच्या मुदतीत राज्य निवडणूक आयोगाचे नियंत्रण व निदेशानुसार निवडणुका पुढे ढकलणे. |
| ३. | नियम ९ (१) व (२) | निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक |
| ४. | नियम १५ | निवडणूक कामाकरिता नेमलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या कामावरील नियंत्रण |
| ५. | नियम, २७ | मतदानापूर्वी उमेदवार मरण पावल्यास उमेदवाराच्या मृत्यूचे प्रतिवृत्त कळल्यावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणूक प्रत्यादेशित केल्याचे जिल्हाधिकारी यांना कळविणे. जिल्हाधिकारी यांनी याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठवून नवीन निवडणूक कार्यक्रम प्राप्त करून घेणे. |
| ६. | नियम ३४(ग) | मतदान केंद्रात व्यक्ती वा अधिकारी यांना प्रवेश देणे |
| ७. | नियम ५३(३) | राज्य निवडणूक आयोगाकडून पुन्हा मतदान घेण्याचा दिवस व वेळ व मतदान केंद्र निश्चित केल्यावर विहित पध्दतीने त्यास प्रसिध्दी देणे. |
| ८. | नियम ५५ (१) (क) व (ख) (२) (क) व (ख) तसेच (३) | मतपेटया किंवा मतदान यंत्रे नष्ट होणे इत्यादी बाबतीत नव्याने मतदान घेणे आवश्यक असल्यास त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करणे. |
| ९. | नियम ५७ (१) (ख) | मतमोजणीसाठी ठरविलेल्या जागी प्रवेश देणे. |
| १०. | नियम ६६ | विहित नमुन्यातील जाहीर निकालाच्या प्रती निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यावर त्या राज्य निवडणूक आयोगास पाठविणे. |